राज्यातील नद्यांच्या प्रदूषित पट्ट्याबाबत कृति आराखडा राबविण्याकरीता पुणे जिल्ह्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या " पर्यावरण सनियंत्रण दलाच्या " पहिल्या दि. ०५/७/२०१९ (शुक्रवार) रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त :-

मा. राष्ट्रीय हरित लवाद, नवी दिल्ली यांचा मूळ अर्ज क्र. ६७३/२०१८ प्रकरणी दि. २०/९/२०१८ रोजीच्या आदेशाच्या अनुशंगाने राज्यातील नद्यांच्या प्रदूषित पट्ट्याबाबत कृति आराखडा राबविण्याकरीता महाराष्ट्र शासनाने दि. १३/१२/२०१८ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे " नदी पुनरुत्थान समिती" ची स्थापना केली. तसेच मा. न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार जिल्हा पातळीवर प्रदूषित नदी पट्ट्यातील प्रदूषण रोखण्याकरिता स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण दलाची (Special Environment Surveillance Task Fore) ची स्थापना प्रदूषित पट्टे असलेल्या जिल्ह्यामध्ये करण्यात यावी असे निर्देशित केले होते. त्याअन्वये पुणे जिल्ह्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या " पर्यावरण सनियंत्रण दलाची " ची पहिली बैठक दि. ०५/७/२०१९ (शुक्रवार) रोजी प्रादेशिक कार्यालय म.प्र.नि. मंडळ, पुणे येथे पार पडली. सदर बैठकीस सदर समितीचे खालील समिती सदस्य उपस्थित होते.

१. श्री. दिलीप खेडकर, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, पुणे
२. श्री. दत्तात्रय लांघी, प्रशासकीय अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, प्रतिनिधी
३. श्री. सी. पी. भागवत, सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण
४. श्री. सुजात इनामदार, पोलिस उपनिरिक्षक, पोलिस अधिक्षक कार्यालय, पुणे
५. श्री. नितीन शिंदे, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ पुणे-१
६. श्री. किरण हसबणीस, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ पिंपरी चिंचवड
७. श्री. उपेंद्र कुलकर्णी, श्री. नितीन शिंदे, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ पुणे-२

प्रथमत: श्री. दिलीप खेडकर, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ यांनी उपस्थितांचे स्वागत केले. तद्नंतर समिती व बैठकीबाबतचा विषय व या बैठकीच्या स्थापनेबाबतची उपरोक्त पार्श्वभूमी व महाराष्ट्र शासनाचा दि. १३/१२/२०१८ रोजीचा निर्णय याबाबत विस्तृत स्वरुपात उपस्थितांना माहिती दिली. सदर समिती हि महाराष्ट्र शासनाच्या निर्णयानुसार प्रदूषित नदी पट्ट्यातील प्रधान्यक्रम-१ व प्रधान्यक्रम-२ मधिल समावेशीत नद्यांचे प्रदूषण कमी करण्याच्यादृष्टीने कृती आराखडा तयार करण्याकरीता गठीत करण्यात आल्याचे सांगीतले. तसचे महाराष्ट्रात वेगवेगळ्या नंद्यावर एकुण ५३ नदी प्रदूषित पट्टे असून, त्यापैकी पुणे जिल्ह्यातील मुळा, मुठा, मुळा-मुठा, पवणा, इंद्रायणी, वेळ, निरा, घोड, इ. नदीवर काही प्रदूषित पट्टे आहेत. त्यामधील प्रधान्यक्रम-१ व प्रधान्यक्रम-२ मधील प्रदूषित पट्ट्यांची माहिती खालीलप्रमाणे .

| अनु. क्र. | नदीचे नाव | प्रदूषित पट्टा | प्रधान्यक्रम |
|---|---|---|---|
| १. | मुळा | बोपोडी ते औंधगाव | १ |
| २. | मुठा | शिवाजीनगर ते खडकवासला धरण | |
| ३. | निरा | सांगवी ते शिक्रापुर | |
| ४. | भिमा | विठ्ठलवाडी ते टाकळी (सोलापुर जिल्हा) | |
| ५. | इंद्रायणी | मोशीगांव ते आळंदीगाव | २ |
| ६. | मुळा-मुठा | थेऊर ते मुंढवा ब्रिज | |
| ७. | पवणा | दापोडी ते रावेत | |

तसेच समितीने इतर करावयाची कामे जसे की, कृती आराखडा तयार करणे, विषय निश्चीती करणे, घरगुती सांडपाणी प्रक्रिया संनियत्रण यंत्रणा व औद्योगीक सांडपाणी संनियंत्रण यंत्रणा यांची सद्यास्थितीबाबत माहिती मिळवणे, वाळु उत्खनन, घनकचरा व्यवस्थापन, प्रदूषित नदीपट्याच्या काठावरील गांवातून / स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यक्षेत्रातून निर्माण होणारे घरगुती व औद्योगीक सांडपाणी याची माहिती संकलीत करणे, नदीचा प्रवाह व्यावस्थीत ठेवणे, नदीच्या दोन्ही बाजूंनी झाडे लावणे इत्यादी त्याचप्रमाणे समितीची स्वत:चे संकेतस्थळ- Website तयार करुन त्यामार्फत जास्तीत जास्त लोकांपर्यत समितीची चालणारी कामे पाहचवणे याबाबतही माहिती दिली. तसेच सदर शासन निर्णयान्वये उपरोक्त कार्यवाही / कामे प्राधान्याने पुर्ण करुन '**दोन महिन्यात समितीने तयार केलेला आराखडा केंद्रिय प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे सादर करावयाचा आहे**' सांगितले.

उपरोक्त विषयाबाबत बैठकी दरम्यान विस्तृत चर्चा होऊन खालील कार्यवाही करावयाचे ठरले.

१. प्रदूषित पट्ट्यामध्ये वाळु उत्खन्न करणाऱ्यांवर एफ.आय.आर. दाखल करणे.
२. प्रदूषित पट्टयामधील प्रत्येक गावातून निर्माण होणारे सांडपाणी तसेच घनकचरा यांची माहिती गोळा करणे जसे की, सांडपाणी , घनकचरा निर्मीती, त्यांची विल्हेवाटीचे ठिकाण सद्यस्थिती, भविष्यात करण्यात येणारी उपाय-योजना.
३. स्वतंत्रपणे समितीचे संकेतस्थळ तयार करुन जास्तीत-जास्त लोकांपर्यन समितीचे काम पोहचवावी. त्याचप्रमाणे स्थानिक वृत्तपत्रामध्ये समिती गठन झाल्याबाबत प्रसिद्धी देण्यात यावी.
४. प्रदूषित पट्ट्यातील गांवामध्ये शाळेतील मुलांना समाविष्ट करुन प्रदूषणाबाबत जनजागृती करण्यात यावी.
५. त्याचप्रमाणे पुढील बैठकीस स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधी व जिल्हा परिषद कार्यालय यांच्या प्रतिनिधींना त्यांची प्रदूषित पट्ट्याबाबत माहिती त्याचबरोबर शिर्घ मुदतीच्या योजना तसेच दिर्घ मुदतीच्या योजना घेऊन हजर राहण्याचे कळविण्याबाबत ठरले.

**********

१. प्रादेशिक अधिकारी - पुणे. [signature]
२. उप- प्रादेशिक अधिकारी - पुणे - १
३. उप- प्रादेशिक अधिकारी - पिंपरी चिंचवड. — [signature]
४. उप- प्रादेशिक अधिकारी - पुणे - २ . [signature]